डाक जीवन बीमा
Postal Life Insurance

# मुंबई दक्षिण विभाग टपाल जीवन विमा विभागकरिता

# थेट अभिकर्त्यांची नियुक्ती करण्याकरिता

**पात्रता आणि अन्य मापदंड :**

१. **वयोमर्यादा :** कमीत कमी १८ वर्षे व जास्तीत जास्त ५० वर्षे.

२. **शैक्षणिक अर्हता :** मान्यताप्राप्त केंद्रीय/ राज्य सरकारच्या बोर्ड/ संस्थांमधून १०वी उत्तीर्ण.

३. **अनुभव :** आवेदनकर्त्याला विमा क्षेत्राबाबत तसेच विपणन क्षेत्रात कुशलता असणे आवश्यक.

४. **श्रेणी :** बेरोजगार/ स्वयंरोजगारीन व्यक्ती, माजी जीवन विमा सल्लागार/ कोणत्याही विमा कंपनीचे माजी अभिकर्ता, माजी सैनिक, अंगणवाडी कर्मचारी, महिला मंडळ कर्मचारी, शाळेचे निवृत्त शिक्षक, स्वयंसाहायता समूह पदाधिकारी इत्यादी टपाल जीवन विमा थेट अभिकर्तासाठी आवेदन करू शकतात.

५. जो उमेदवार थेट अभिकर्ता म्हणून निवडला जाईल त्याला टपाल विभागाने वेळोवेळी ठरविलेले कमिशन/ प्रोत्साहन भत्ता दिला जाईल.

६. थेट मुलाखतीद्वारे टपाल जीवन विमा/ ग्रामीण टपाल जीवन विमाचे उमेदवार नियुक्त केले जातील. नियुक्त उमेदवारांना आंतरिक/ व्यावहारिक प्रशिक्षण देण्यात येईल.

७. नियुक्त उमेदवारांना परवाना परीक्षेसाठी हजर राहावे लागेल आणि परवाना परीक्षा व पशिक्षण पूर्ण केल्यानंतरच परवाना देण्यात येईल.

८. निवड झालेल्या उमेदवारांना तात्पुरता परवाना देण्याकरिता रु.५०/- आणि परवाना परीक्षेसाठी रु.४००/- फी म्हणून जमा करावे लागतील.

९. निवड झालेल्या थेट अभिकर्त्याला रु.५,०००/-चे राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र (एन.एस.सी.)/ किसान विकास पत्र (के.व्ही.पी.) भारताच्या राष्ट्रपतींच्या नावे तारण म्हणून ठेवावे लागेल.

१०. थेट मुलाखतीकरिता उमेदवारांनी प्रवर अधीक्षक, टपाल जीवन विमा विभाग, मुंबई दक्षिण विभाग टपाल कार्यालय, नवी ॲनेक्स बिल्डिंग, मुंबई-४०० ००१ येथे थेट मुलाखतीकरिता **दिनांक १५.१२.२०२० ते १७.१२.२०२० रोजी सकाळी ११.०० वा. पासून संध्या. ०४.०० वा.पर्यंत** आपल्या शैक्षणिक प्रमाणपत्र तसेच पॅन कार्ड, आधार कार्ड व अन्य संबंधित दस्तावेजसोबत उपस्थित राहावे.